Tarak
Step in for Health
Dry Fruit
• डिंकलाडू सामग्री
• बेस्ट क्वालिटी ड्रायफ्रुटस् ,पेंडखजूर
सिटी प्राईड बिल्डींग, डोमिनोज पिझ्झा के निचे, मोंढानाका के पास जालना रोड, औरंगाबाद मो.97632 64854 फोन (0240) 6614525
LUNIYA / 2358501

## काव्य वाचनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**औरंगाबाद :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने कौमी एकता सप्ताहअंतर्गत भाषिक सुसंवाद दिनानिमित्त सोमवारी (दि. २१) गटस्तरावर काव्य वाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्र. सहायक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच कल्याण निरीक्षक बी. टी. भले यांची विशेष उपस्थिती होती. प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. कवी शिवराज पटणे व कवी सुनील उबाळे यांनी अनेक सामाजिक प्रश्नांना कवितेच्या माध्यमातून स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. काव्य वाचनाचा हा कार्यक्रम रसिकांना विशेष आनंद देऊन गेला. कार्यक्रमास कामगारांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

### ७८९ कोटींचे अनुदान : मंजुरीची वाट पाहण्यात गेले २ महिने

# जालना रोड, बायपासची टेंडर संचिका दिल्लीतच

**औरंगाबाद :** बीड बायपास रुंदीकरण, जालना रोडचे रुंदीकरण आणि शिवाजीनगर रेल्वे ओव्हर ब्रीजसह मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन ते सिडको बसस्थानक चौकापर्यंतच्या ७८९ कोटींच्या या प्रकल्पाची संचिका दोन महिन्यांपासून दिल्लीतील नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडियाच्या मुख्यालयात रेंगाळली आहे. स्थानिक कार्यालय चातकाप्रमाणे त्या संचिकेला मंजुरी मिळून टेंडर होण्याची वाट पाहत आहे. अजून काही ती संचिका पुढे सरकेना, दोन महिन्यांपासून टेंडर संचिका दिल्ली मुख्यालयात पडून आहे.

४०० कोटी रुपयांतून जालना रोडचे सहापदरीकरण आणि ३८९ कोटी बीड बायपासच्या सहापदरीकरणासाठी केंद्र शासनाच्या दळणवळण खात्याकडून मिळण्याचा दावा सरत्या वर्षाच्या सुरुवातीपासून होतो आहे. ११ एक्सिलेटर (सरकते जिने), ३२ बसस्टॉप, ५ उड्डाणपुलांचा हा रोड असेल. सप्टेंबर महिन्यात जालना रोडसाठी निविदा प्रक्रियेसाठी पूर्ण दस्तवेज नॅशनल हायवे अॅथॉरिटी ऑफ इंडियाच्या (एनएचएआय) दिल्ली येथील मुख्यालयाकडे पाठविले. डिटेल प्रोजेक्ट रिपोर्टदेखील (डीपीआर) त्यासोबत जोडला आहे. पादचाऱ्यांसाठी सरकत्या जिन्याचे अकरा फूट ओव्हरब्रीज तयार केले जाणार आहे. या रस्त्यावर ५ छोटे उड्डाणपूल तयार करण्याबरोबर पादचाऱ्यांनाही विनाअडचण रस्ता ओलांडण्यासाठी फूट ओव्हरब्रीज तयार करण्याचा विचार आहे. चिकलठाणा, मुकुंदवाडी, हायकोर्ट, सेव्हन हिल, केळकर हॉस्पिटल कोटला कॉलनी, बाबा पंपचौक व होलिक्रॉस शाळेजवळ रहदारीच्या रस्त्यावर ब्रीज व जिने डिझाईनमध्ये दाखविण्यात आले आहेत. गरजेनुसार ही ठिकाणे बदलण्याची शक्यता आहे.


बीड बायपास


जालना रोड

### डीपीआरमध्ये काय आहे...

- जालना रोडसाठी सहापदरी डिझाईन तयार केले. महावीर चौक ते सेव्हन हिल, सेव्हन हिल ते केम्ब्रिजपर्यंत दोन टप्प्यांचे ते डिझाईन आहे, तर सिडको ते मुकुंदवाडी रेल्वेस्टेशनचा रोड देखील याच डिझाईनमध्ये असून, शिवाजीनगर रेल्वे क्रॉसिंग पुलाच्या अंदाजपत्रकाचा यातच समावेश आहे. महावीर चौक ते सेव्हन हिलपर्यंत जागा कमी असल्याने येथे दुचाकी चालकांसाठी वेगळी लेन राहणार नाही.
- सेव्हन हिल ते केम्ब्रिजपर्यंत जागा उपलब्ध असल्याने पादचारी, दुचाकी चालकांच्या लेनशिवाय सहापदरी मार्ग होणे शक्य होईल, असे एनएचआयने डीपीआरमध्ये म्हटलेले आहे.
- एनएचएआयचे प्रकल्प संचालक यु.जे.चामरगोरे यांनी डिझाईन, डीपीआर तयार करुन निविदा प्रक्रियेसाठी दिल्लीला पाठवून १९ नोव्हेंबर रोजी दोन महिने झाले आहेत.

हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी
Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016
In association with SAFFRON LANDMARKS
Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY
सदृढ आरोग्यासाठी आणि स्मार्ट सिटी ही मॅरेथॉन महत्वपूर्ण ठरणार आहे. फिटनेससाठी प्रत्येक जण धावत असतो. या मॅरेथॉनमध्ये मी सहभागी होणार असून जास्तीत जास्त लोकांनीही त्यामध्ये सहभागी व्हावे.
-डॉ. उज्ज्वला दहिफळे


पगारिया ऑटो... डावीकडून ययाती पवार, योगेश बारवाल, विशाल बावस्कर, दत्ता खैरे, गोरख जाधव, महेश जैन, कैलास सोनवणे, सुनील जाधव, गजानन गवळी, महेश गेवारे, स्वप्नील, समीर पवार.
Co-Sponsors: RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल (स्थापना वर्ष : १९९५) गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION
Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (I) pvt.ltd | Partner
नाव नोंदणी व सहभागासाठी
www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

## महत्त्वाचे

### रेल्वे प्रवाशांची तारांबळ

औरंगाबाद : नंदीग्राम एक्स्प्रेसची एसी बोगी नियोजित ठिकाणी नसल्यामुळे प्रवाशांची शनिवारी तारांबळ उडाली. रेल्वे येण्यापूर्वी फलकावर दर्शविण्यात येणारी एसी बोगीची स्थिती आणि प्रत्यक्ष रेल्वे आल्यानंतरची स्थिती यामध्ये मोठे अंतर राहिल्याने जागा पकडण्यासाठी ऐनवेळी प्रवाशांना धावपळ करावी लागली.

### बबलू पा. अंधारे यांची नियुक्ती



औरंगाबाद : राष्ट्रवादी काँग्रेसच्या औरंगाबाद शहर संघटकपदी बबलू पा. अंधारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहराध्यक्ष राहुल तायडे यांनी त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र दिले.

### अक्षय पाटील यांची प्रदेश सचिवपदी निवड

औरंगाबाद : राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी अक्षय शिवाजी पाटील यांची निवड करण्यात आली. ही निवड प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते पाटील यांनी केल्याचे पत्रकाद्वारे कळविले आहे.

### कर्मचारी संघटनेच्या दहा मागण्या मान्य

औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य लघुवेतन सरकारी कर्मचारी संघाची वैद्यकीय शिक्षणमंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत बैठक पार पडली. यावेळी संघटनेतर्फे मांडण्यात आलेल्या १९ पैकी १० मागण्या मान्य करण्यात आल्या. यावेळी अभ्यागत समितीचे अध्यक्ष आ. अतुल सावे, संघटनेचे कार्याध्यक्ष सी. वाय. बनसोडे, विभागीय सचिव सय्यद अझीम सय्यद महेबूब, जिल्हा कार्याध्यक्ष शेख उमर शेख उस्मान, जिल्हाध्यक्ष दि. मा. वाघ, जिल्हा सहसचिव प्रकाश मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष असद बेग रहीम बेग आदी उपस्थित होते.

### घाटीतील रिक्त पदे भरण्याची मागणी

औरंगाबाद : घाटी रुग्णालयात वर्ग-३ व ४ च्या अनेक जागा रिक्त आहेत. अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे रुग्णसेवेवर परिणाम होत आहे. रिक्त पदे भरण्यात यावीत, अशी मागणी भीमशक्ती कर्मचारी संघटनेचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पोहाल यांनी अधिष्ठातांकडे केली आहे.

### स्वच्छतागृह बांधण्याची मागणी

औरंगाबाद : शासकीय कॅन्सर हॉस्पिटलमध्ये स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी औरंगाबाद जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अल्पसंख्याक विभागाने निवेदनाद्वारे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्याकडे केली आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष शेख आसिफ शेख मेहबूब, सय्यद आमेर जहागीरदार, रियाज खान, इसामुद्दीन काजी, जैनुल आबेदीन आदी उपस्थित होते.


'इको निडस् फाऊंडेशन' या संस्थेने राजस्थानमधील धानोरा गावात सिंचन तलाव तयार केला. पावसाळ्यात हा तलाव तुडुंब भरला असून, दूरपर्यंत शेतीला पाणी देण्यासाठी केलेल्या चारीतून पाणी वाहत आहे.

# 'स्मार्ट व्हिलेज' संकल्पनेत औरंगाबादकरांचा वाटा

### पथदर्शी उपक्रम : केंद्र सरकारने घेतली 'इको निडस्'ची दखल

**औरंगाबाद : राजस्थानमध्ये** जाहीर करण्यात आलेल्या 'स्मार्ट व्हिलेज' या योजनेचा दुवा औरंगाबादशी जोडलेला आहे. औरंगाबादेतील तरुणांनी सुरु केलेल्या 'इको निडस् फाऊंडेशन' या सामाजिक संस्थेने राजस्थानमधील धोलपूर जिल्ह्यातील धानोरा गावचा अवघ्या दोनच वर्षांत संपूर्ण कायापालट केला. त्यामुळे मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी 'स्मार्ट व्हिलेज' या योजनेसाठी धानोरा गावचा उपक्रम हा 'पायलट प्रोजेक्ट' म्हणून स्वीकारला आहे. याशिवाय केंद्र सरकारनेदेखील या उपक्रमाची दखल घेतली आहे, हे विशेष!

'इको निडस् फाऊंडेशन' ही औरंगाबादेतील तरुणांनी सुरु केलेली सामाजिक संस्था. शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात कार्यरत प्रा. प्रियानंद आगळे हे या संस्थेचे सर्वेसर्वा आहेत. प्रा. आगळे यांनी पर्यावरण संरक्षणावर मोठी चळवळ सुरु केली असून, औरंगाबादेतील खाम नदी तसेच सुखना नदीची स्वच्छता मोहीम यशस्वी केली आहे. मागील दोन वर्षांपूर्वी प्रा.आगळे यांनी राजस्थानमधील वाळवंटात निसर्ग उभा करण्याचा संकल्प केला. आपल्या सहकाऱ्यांसमवेत ते धानोरा गावी गेले. त्या गावात पिढ्यान्पिढ्या पक्के रस्ते, शौचालये, सिंचन व्यवस्था किंवा शाळेचा लवलेशही नव्हता. अवघ्या दोनच वर्षांत या गावात सिमेंटचे आधुनिक रस्ते, शौचालये, धानोरा शिवारात सिंचन तलाव, शेतीला लागून छोटेखानी चारी निर्माण करण्यात आली. मुलांसाठी शिक्षणाची कायमस्वरुपी व्यवस्था म्हणून शाळेसाठी पक्की इमारत उभी करण्यात आली. लवकरच हे गाव 'वायफाय' केले जाणार आहे. तत्पूर्वी, स्थानिक नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम प्रा. आगळे यांच्यासह डॉ. सत्यपाल मीना, अॅड. अत्तदीप आगळे व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. डॉ. मीना व अॅड. आगळे यांनी २०१४ मध्ये धानोरा गावात करावयाच्या कामांचा मसुदा तयार केला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

या कामासाठी कोका कंपनीने सामाजिक दायित्व निधी दिला. याशिवाय राजस्थान सरकारने शौचालये तसेच शाळा इमारतीसाठी निधी खर्च केला. औरंगाबादेतील काही नागरिकांनीही यासाठी 'इको निडस् फाऊंडेशन'च्या या स्तुत्य उपक्रमाला हातभार लावला.

- नुकताच मुख्यमंत्री वसुंधरा राजे यांनी राजस्थानमध्ये 'स्मार्ट व्हिलेज' ही योजना राबविण्याचा निर्णय जाहीर केला असून, त्यासाठी 'इको निडस्'च्या मदतीने कायापालट झालेले धानोरा गाव हा या योजनेसाठी पथदर्शी उपक्रम म्हणून लोकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. केंद्रीय मंत्री व्यंकय्या नायडू यांनीही धानोरा गावाची दखल घेतली असून, यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीसमोर ठेवण्याची घोषणा केली. ही औरंगाबादकरांसाठी कौतुकाची बाब आहे, असे उद्गार प्रा. प्रियानंद आगळे यांनी काढले.

# भाजपची शिवसेनेवर आगपाखड

### फटाका मार्केट : किरकोळ विक्रेत्यांच्या तोंडाला पुसली पाने

**औरंगाबाद : जिल्हा** परिषद मैदानावर दिवाळीदरम्यान भरलेल्या फटाका मार्केटला २९ ऑक्टोबर रोजी लागलेल्या आगीवरुन भाजपने शिवसेनेवर आगपाखड सुरु केली आहे. आगीच्या घटनेला महिना होत आला असून, किरकोळ व्यापाऱ्यांना पालिकेने मदतीपोटी एक छदामही दिलेला नाही, तर फटाका असोसिएशननेदेखील याप्रकरणी दुटप्पी धोरण स्वीकारले आहे. पोलीस आणि पालिकेच्या चुकांमुळे सामान्य व्यापाऱ्यांचे नुकसान झाल्याचा आरोप भाजपने केला असून, याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दाद मागण्यात येणार असल्याचे भाजप कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय केणेकर यांनी सांगितले.

फटाका मार्केटला आग कशामुळे लागली, त्याला एनओसी देणाऱ्या संस्थांचा हलगर्जीपणा जबाबदार आहे काय, याचा शोध अजूनही लागलेला नाही; परंतु नुकसान झालेल्या व्यापाऱ्यांना जाहीर केलेली मदत अजूनही मिळालेली नाही, त्यामुळे अनेकांना कर्जबाजारी होण्याची वेळ आली आहे. फटाका मार्केटच्या अग्निकांडातील नुकसानग्रस्तांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदतीची मागणी झाली. फटाक्यांची १४० दुकाने आगीत खाक झाली. तसेच ११२ वाहनेही जळाली. यात एकूण १० कोटी ५८ लाख ३७ हजार ६७० रुपयांचे नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने तयार केला. फटाका मार्केटला लागलेल्या आगीत दुकान जळालेल्या एका व्यापाऱ्याने सांगितले, पंचनामा झालेल्या दिवसापासून आजपर्यंत कुणीही संपर्क केलेला नाही. लोकांकडून उसने पैसे घेऊन माल भरला होता. तो सर्व जळाला. फटाका असोसिएशन, राजकीय नेते, मनपाकडून कुणीही विचारणा केलेली नाही. पोलिसांनी मात्र जबाबासाठी घरापर्यंत हजेरी लावून उचलून नेले.

### राजकारणापुरते आश्वासन

- शिवसेनेने राजकारणापुरतेच आश्वासन दिले. मदत मिळवून देऊ अशी भाषा करणारे आता कुठे गेले, असा सवाल भाजप कामगार मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजय केणेकर यांनी केला. पोलीस आणि पालिका एकमेकांच्या दोषावर पांघरुन घालण्यात दंग आहेत. पालिकेने १ लाख रुपये प्रत्येकी मदत देण्याची घोषणा केली. एक छदामही गरीब व्यापाऱ्यांना मिळालेला नाही. आगीत बहुतांश दुकाने गरीब व्यापाऱ्यांची होती. त्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचे केणेकर म्हणाले.

## शिक्षक भारतीचे सदस्य नोंदणी अभियान सुरु

**औरंगाबाद :** राज्यात पहिल्या क्रमांकाची शिक्षक संघटना, अशी ओळख निर्माण करण्यासाठी शिक्षक भारतीने राज्यभरात आजीव सदस्यता नोंदणी अभियान गतिमान केले आहे. यासंदर्भात काल जिल्हाध्यक्ष प्रकाश दाणे यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेच्या प्रांगणात जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. आजीव सदस्य नोंदणीसाठी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेण्याचे आवाहन दाणे यांनी केले. यावेळी सुनील चिपाटे, संतोष ताठे, मुश्ताक शेख, मच्छिंद्र शिंदे, मच्छिंद्र भराडे, महेंद्र बारवाल, रमेश जाधव, दत्ता गायकवाड आदींसह शिक्षक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'स्मार्ट सिटी'च्या बोधचिन्ह स्पर्धेतही महापालिकेत अनास्था!

### कलावंत त्रस्त : प्रशासनाकडून सहकार्य नाही

**औरंगाबाद : ऐतिहासिक** औरंगाबाद शहराचा 'स्मार्ट सिटी'मध्ये नुकताच समावेश करण्यात आला आहे. औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचीही स्थापना करण्यात आली आहे. कंपनीचे बोधचिन्ह तयार करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शहरातील उदयोन्मुख कलाकारांनी अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांच्या पदरी बक्षीस तर सोडा फक्त आणि फक्त मनस्ताप आला...!

स्मार्ट सिटीचे बोधचिन्ह अत्यंत आकर्षक व्हावे म्हणून मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांनी लोकसहभागाला महत्त्व दिले. लोगो तयार करण्यासाठी शहरातील कलावंतांनी सहकार्य करावे, असे आवाहन मनपाने जाहिरातीद्वारे केले. सर्वोत्कृष्ट बोधचिन्ह तयार करणाऱ्या कलावंतास पन्नास हजार रुपये, द्वितीय पारितोषिक ३० हजार तर तृतीय पारितोषिक २० हजार रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले. बोधचिन्ह 'कोरल ड्रॉ'मध्ये तयार करावेत. पीडीएफ आणि जेपीईजी फॉरमॅटमध्ये मनपाच्या वेबसाईटवर मेल करावेत असे सांगण्यात आले. आश्चर्याची बाब म्हणजे रविवार २० नोव्हेंबर शेवटी तारीख असल्याचेही जाहिरातीत जाहीर करण्यात आले. मनपाच्या वेबसाईटवर बोधचिन्ह कुठे सेंट करावा याचा अजिबात उल्लेख नव्हता. त्रस्त कलाकारांनी अखेर सुटीच्या दिवशी महापालिका कार्यालय गाठले. रविवारच्या दिवशी कोणीच सापडले नाही. स्मार्ट सिटीचे काम पाहणाऱ्या अधिकाऱ्यांना कलाकारांनी फोन केले. अधिकाऱ्यांनी त्यांना उडवा उडवीची उत्तरे दिली. सोमवारी काही कलाकारांनी प्रत्यक्ष मनपात जाऊन बोधचिन्ह दिले. हे बोधचिन्ह सुद्धा स्वीकारण्यास अधिकारी नकारघंटा वाजवीत होते.

आधी

टीव्ही सेंटर येथील दुर्लक्षित बसथांबा.

नंतर


युवकांनी सफाई करुन रंगरंगोटी करुन माणुसकीची भिंत तयार केली आहे.

# नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा

### माणुसकीची भिंत : टीव्ही सेंटर येथील दुर्लक्षित बसस्थांब्याचे रुपडे बदलले

**औरंगाबाद : 'नको** असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा' माणुसकीची भिंत या उपक्रमाने टीव्ही सेंटर येथील नागरिकही आश्चर्यचकित झाले आहेत.

'माझे शहर, सुंदर शहर'फक्त घोषणा करणे आणि ती प्रत्यक्षात अमलात आणणे याची मजाच काही और आहे. टीव्ही सेंटर परिसरातील दुर्लक्षित बस थांब्याची अवस्था वाईट झाली होती. प्रवासीदेखील तेथे थांबणे किंवा उतरण्यास तयार नव्हते. आपण काही तरी केले पाहिजे, अशी प्रेरणा मुलांत निर्माण झाली अन् माणुसकीची भिंत या उपक्रमात मुलांनी सहभाग नोंदविला. आपण गरजूंची कशी मदत करावी याचा विचार करीत अमर लोखंडे, प्रदीप कदम, सुशांत गोहित, सुबोध मोरे, महेश सावळा या युवकांनी कॉलेजनंतर रिकाम्या वेळेत हा बसथांबा रंगविला. ज्यांच्याकडे जुने वापराचे कपडे असतील त्यांनी दान करुन गरजूंची मदत करावी. तुम्हाला नको असेल ते येथे आणून टाकावे आणि ज्यांना हवे असेल त्यांनी त्या कपड्यातून घेऊन जावे, अशी ही संकल्पना आहे.

हा चांगला उपक्रम विविध शहरात राबविला जात असून, यात कुणाला काहीही शुल्क आकारले जाणार नाही. समाजात आपली माणुसकीची भिंत टिकून राहावी, असे या युवा टीमचे म्हणणे आहे. अजूनही बहुतांश युवक-ज्येष्ठ नागरिकांचे सहकार्य विविध वर्गातून लाभत आहे.

### लोकमत इम्पॅक्ट : अभ्यागत समितीच्या बैठकीत चर्चेनंतर मंजुरी,'इन्सिनरेटर' चाही प्रस्ताव

# कचरा टाकण्यासाठी नव्या जागेला मंजुरी

**औरंगाबाद :** घाटी रुग्णालयातील वैद्यकीय घनकचऱ्यातून (बायोमेडिकल वेस्ट) आणि ओला-सुका कचरा मूत्रपिंड विकार व मूत्रपिंडरोपण विभागाच्या बाजूला फेकण्याचा प्रकार आता कायमचा थांबणार आहे. नव्या जागेत कचरा टाकण्यास अभ्यागत समितीने शनिवारी मंजुरी दिली.

घाटीतील वैद्यकीय घनकचरा थेट मूत्रपिंड विकार व मूत्रपिंडरोपण विभागाच्या बाजूला फेकला जात असल्याचा प्रकार 'लोकमत'ने ८ ऑक्टोबर रोजी उघडकीस आणला. वृत्तमालिकेतून कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर बाबींवर प्रकाश टाकण्यात आला. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाहणी करुन सक्त सूचना केल्या. परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरत असल्याने रुग्णांना आणि त्यांच्यासोबत असलेल्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागतो. ओला-सुका कचऱ्यासह वैद्यकीय घनकचराही उघड्यावर टाकला जातो. हा प्रकार समोर आणल्यानंतर जागे झालेल्या घाटी प्रशासनाने हा परिसर दुर्गंधीमुक्त होण्यासाठी ओला-सुका कचरा टाकण्यासाठी अन्य जागेची शोधाशोध सुरु केली. अखेर घाटीतील जुन्या वॉर्ड क्रमांक ८, ९ च्या पाठीमागील जागेची त्यासाठी निवड करण्यात आली.

अर्धा एकर असलेल्या या जागेत रुग्णालयातील वैद्यकीय घनकचरा व ओला-सुका कचरा साठविण्यासाठी मंजुरी मिळावी, यासाठी अभ्यागत समितीच्या बैठकीत वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुधीर चौधरी यांनी हा विषय मांडला. यावेळी चर्चेनंतर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जागा स्थलांतर करण्यास तात्काळ मंजुरी दिली.

घाटीत रुग्णसेवेतून दररोज शेकडो किलो वैद्यकीय घनकचरा जमा होतो. या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी घाटी प्रशासनाने काही वर्षांपूर्वी 'इन्सिनरेटर' बसविले. यामध्ये टाकलेला कचरा उच्च उष्णतेमुळे जळतो. याचे आरोग्यावर कोणतेही परिणाम होत नाहीत. प्रारंभी या यंत्रणेचा प्रभावीपणे वापर करण्यात आला.


घाटी रुग्णालय : मूत्रपिंड विकार व मूत्रपिंडरोपण विभागाचा परिसर दुर्गंधीमुक्त करण्याच्या हालचाली; अनेक वर्षांपासून फेकला जातो कचरा
कचरा टाकण्यासाठी जागेची शोधाशोध
'लोकमत'मध्ये प्रकाशित केलेले वृत्त

### नव्या जागेत 'इन्सिनरेटर'

- घाटीतील 'इन्सिनरेटर'ची यंत्रणा मध्यंतरी बंद पडली. तेव्हापासून ही यंत्रणा सुरु झालेली नाही. त्यामुळे आजघडीला घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एका कंपनीला कंत्राट देण्यात आले आहे. त्यामुळे या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी लाखो रुपये मोजण्याची वेळ येत आहे.
- हा खर्च वाचविण्यासाठी नव्या जागेत 'इन्सिनरेटर' बसविण्याचा प्रस्ताव सादर करण्याची सूचना करण्यात आली.